Golden Research Thoughts ISSN 2231-5063
Volume-3, Issue-1, July-2013

# वेगळे विदर्भ राज्य का ?

**स्वप्नील अंकुशराव बोधणे , दिनकर एस. कळंबे**
संशोधन विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना

***शोध सारांश :*** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1956 साली राज्यपुर्नगठण आयोगाद्वारे देशात भाषांवार प्रांतरचना निर्माण करण्यांत आली. भाषावार प्रांतरचनेमुळे प्रादेशिक निष्ठा, प्रांतीयता, फुटीरवादी संपुष्टात येईल असे वाटले होतेय परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळीच परिस्थिती निर्माण झाली. काही नवे प्रश्न निर्माण होउन राज्यात संकुचित भाशिक प्रादेशिकता प्रकट होउ लागली. महाराष्ट्र–गुजरात, महाराष्ट्र–कर्नाटक, पंजाब–हरियाणा असे सीमावाद उत्पन्न झाले. मराठी भाषिकांनी व गुजराती भाषीकांनी स्वतंत्र राज्याची मागणी केली. 1956 ते 1960 या काळात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने तर गुजरातमध्ये महागुजरात जनता परिषदेने उग्र आंदोलने केली त्यातूनच 1960 साली महाराष्ट्र व गुजरात ही दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करण्यांत आली.[1]

***प्रस्तवाना –***

वेगळया राज्याच्या मागणीसाठी अनेक कारणे कारणीभुत ठरत असतात जसे भाशा, जात, वंश, प्रादेशिक पक्ष, नेतृत्व आणि सर्वात महत्वाचे प्रादेशिक असमतोल तो सामाजिक, आर्थिक शैक्षणिक, राजकिय इ. प्रकारचा असतो. महाराष्ट्रातील वेगळया विदर्भ राज्याच्या मागणीस भाषा, जात या गोष्टीपेक्षा असमतोल विकासाच जास्त कारणीभूत ठरला आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ मागासलेलाच राहिला आहे आणि या मागासलेपणाच्या भावनेतुनच विदर्भ जनता वेगळया विदर्भ राज्याची मागणी करत आहेत.[2]

1 मे 1956 रोजी द्विभाषीक मुंबई राज्याची स्थापना झाली. त्यानंतर झालेल्या 1957 साली निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महाराष्ट्रासह मराववाडयात आणि महागुजरात समितीने गुजरातमध्ये कॉग्रेसच्या दारुण पराभव केला. विदर्भत 62 पैकी 54 आमदार कॉग्रेसचे निवडून आले होते. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भातील सर्व आमदारांनी आपआपले राजीनामे त्यांचे नेते मारोतराव कन्नमवार यांच्याकडे सुपुर्द केले होते. परंतु पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या आग्रहामुळे विदर्भवादी कॉग्रेसजन संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यास तयार झाले. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र आजच्या सारखा साकार होउ शकला.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी मुंबईतील विराट सभेत भाषण करताना तेंव्हाचे पंतप्रधान पंडित नेहरु म्हणाले. मुंबईचे वैभव कायम राखा आणि विदर्भाला सुखी करा ! पंडितजींचा हा सल्ला महाराष्ट्राच्या तेंव्हाच्या व नंतरच्या सरकारांनी कितपत खरा केला याचा लेखाजोखा फारसा समाधानकारक नाही. मुंबईचे वैभव वाढले असले तरी विदर्भाचे नष्टचर्य मात्र कायम राहिले आहे. ते दूर करायचे तर राज्याला अनेक महत्वाकांक्षी विकास योजना तातडीने हाती घेणे भाग आहे. तसे करतांना विदर्भाला झुकते माप द्यावे लागले तरी ते देणे भौगोलिक न्यायाच्या सुत्रानुसार सरकारचे कर्तव्य आहे. त्यासाठी समर्थ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.राज्याचे आताचे व यापुढे येणारे राज्यकर्ते अशी इच्छाशक्ती दाखवतील ही विदर्भातील जनतेची अपेक्षा आहे.[3]

4 जानेवारी 2010 रोजी घेतलेल्या बैठकीत विदर्भातील सर्व राजकीय पक्षांनी आपले मतभेद विसरुन विदर्भ राज्यासाठी आम्ही एकत्र आलेले आहोत. विदर्भ होईपर्यंत आम्ही एकत्र राहू ही ग्वाही दिली. त्याचबरोबर विदर्भ राज्य निर्माण करण्यासाठी विदर्भ राज्य संग्राम समिती स्थापन केली तिचा स्वतंत्र झेंडाही असेल, असे जाहिर केले. ही घटना विदर्भातील पक्षाचे कार्यकर्ते आणि जनता यांचा मानसिक दृष्टिकोन उर्वरित महाराष्ट्रातून वेगळा झाला आहे हेच दर्शविते. पुढे विदर्भ बंद केलेल्या आव्हानाला गावा–गावांत शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. त्यामुळे महाराश्ट्रातील अनेक व्यक्तींकडून विदर्भाच्या वेगळया राज्याची भावना कां निर्माण झाली?याची सातत्याने विचारणा होत आहे.[4] त्यासाठी खालील काही कारणांचा उल्लेख करता येईल.

शेती जल सिंचनाच्या बाबतीत विदर्भाची स्थिती फार वाईट आहे. नद्या आहे पण योजना नाही. सिंचन प्रकल्प केवळ कागदावरच आहेत. एखाद्या वेळी पाउस पडला तरी दुष्काळाची स्थिती निर्माण होते. विदर्भ विकासाचा अनुशेश भरून काढण्यासाठी डॉ. वि.म. दांडेकर समिती नेमली गेली होती. 20 ते 30 वर्शापूर्वी विदर्भ विकासाचा अनुशेष 12 हजार कोटी रूपये होता. त्यामध्ये पाटबंधारे, शिक्षण, आरोग्य सेवा, रस्ते, पाणी पुरवठा, पशुवैद्यकीय सेवा इत्यादींचा समावेश होता. 1990 पर्यंत 12 हजार कोटींपैकी केवह 3500 कोटीचा अनुशेश दूर करण्यांत आला. उरलेला अनुशेष दुर करण्यासाठी 1996 मध्ये वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या अनुशेषाकडे दुर्लक्ष करून वैधानिक विकास महामंडळाला वर्षाला 105 कोटी रूप्ये देण्याचे ठरले. दरवर्शी तेवढाच निधी मिळत असल्यामुळे विदर्भ विकासाचा अनुशेष वाढत जाउन 25 ते 30 हजार कोटी रूपये झाला.[5]

1984 मध्ये राष्ट्रपतीनी विकास निधीच्या समन्यायी वाटपाची व राज्याच्या सर्व विभागांच्या समतोल विकासाची जबाबदारी महाराष्ट्राच्या राज्यपालांवर सोपविण्याचा ठराव मंजूर केला. या ठरावाची अंमलबजावणी मार्च 1994 मध्ये झाली व मा. राज्यपालांवर निधी वाटपाची व सर्व विभागांच्या समतोल विकासाची तसेच शासकीय नोकरीत व उच्च शिक्षणात लोकसंख्येच्या प्रमाणात संधी देण्याची विशेष जबाबदारी सोपविण्यांत आली. ही जबाबदारी पार पाडण्यात मा. राज्यपालांनी दरवर्षी निर्देश दिले व निधीचे वाटप केले. तसेच विभागीय असमतोलाची नवीन स्थिती काय आहे हे ठरविण्यासाठी अनुशेष व निर्देशांक समिती स्थापन केली. या समितीचा अहवाल 2000 मध्ये सादर झाला व त्याला शासनाने मान्यता दिली. या अहवालाप्रमाणे विदर्भाचा मागासलेपणा व अनुशेश कितीतरी पटीने वाढला हे स्पष्ट झाले. हा अनुशेष दरवर्षी अजूनही सारखा वाढत आहे व सर्वच विकासक्षेत्रात विदर्भ मागे पडत असल्याचे चित्र स्पष्ट होते. विदर्भ नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द असा प्रदेश आहे. राज्यातील एकूण प्रमुख खनिजांपैकी 97 टक्के खनिज विदर्भात आहे. परंतु या खनिजावर आधारित उद्योग विदर्भात नाहीत. ही शोकांतिका आहे. रस्ते विकासाबाबत विचार केल्यास वेगवेगळया प्रकारचे विदर्भातील रस्ते राज्य सरासरीला येण्यास जवळपास 7 हजार कोटी खर्च करावे लागतील. कृषीपंपाच्या बाबतीत विदर्भाचा अनुशेष जवळपास 3. 5 लक्ष कृषीपंप आहे, म्हणजे राज्य विद्युतीकरण विदर्भात करावे लागेल व या करीता महावितरण कंपनीने दिलेल्या माहितीप्रमाणे अंदाजे 5208 कोटी खर्च येईल.[6]

विदर्भाच्या या मागासलेपणामुळे नक्षलवादी चळवळ मोठया प्रमाणात विदर्भत सुरु झाली आहे. राज्य शासनाने घोषित केलेल्या एकुण 38 नक्षल प्रभावित तालुक्यापैकी 37 तालुके विदर्भातीलच आहेत व फक्त किनवट तालुका नांदेड जिल्हयातील आहे. विदर्भाच्या मागासलेपणाचा आणखी एक दाखला म्हणजे 2011–2012 या वित्तीय वर्षात राज्य शासनाने मानव विकास निर्देशाकांत जे तालुके सर्वात मागे आहेत अशा 125 तालुक्यांकरिता विशेष निधीची तरतूद केली. या 125 तालुक्यांपैकी विदर्भातील 60 तालुके आहेत.

वरिल गोष्टींचा विचार करता असे लक्षात येते की, प्रादेशिक असमतोलामुळे विदर्भाचा विकास झालेला नाही. आणि याच कारणास्तव गेल्या पाच वर्षात विदर्भातील शेतक–यांनी केलेल्या आत्महत्या, अमरावती विभागातील आदिवासी मुलांच्या वाटयाला कुपोषणामुळे तेवढयाच मोठया संख्येने आलेले मरण, गडचिरोली जिल्हयात आदिवासींच्या आणि पोलिसांच्या नक्षलवाद्यांनी केलेल्या हत्या आणि वर्षाकाठी वाढत जाणारा विकासाचा अनुशेष या सा–या विदर्भाच्या वाटयाला गेल्या. 50 वर्षात आलेल्या गोष्टी आहेत. विदर्भाच्या भौतिक–आर्थिक विकासातच असमतोल आहे असे नाही. तर पश्चिम महाराष्ट्र व मुंबई सोडून इतर भागात (मराठवाडा व कोकण) यांच्या भौतिक विकासात कमी–जास्त प्रमाणात असमतोल आहे. हा असमतोल नाहिसा करावयाचा किंवा कमी करावयाचा असेल तर कायमस्वरुपी संस्थात्मक यंत्रणा ( Institutional arrangement) व्यवस्था करणे गरजेचे आहे. निरनिराळे कार्यक्रम व प्रकल्प यांच्यावर अंमलबजावणी व निगराणी ठेवण्याकरिता माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालयाची स्थापना 1989 साली केली.गरिबी निर्मुलनाचा 20 कलमी कार्यक्रम, मोठे प्रकल्प व मुलभूत सुविधांच्या 9 मंत्रालयांच्या कामकाजाची अंमलबजावणी व निगराणी या मंत्रालयाकडे आहे. दर महिन्याच्या 9 तारखेला मागच्या महिन्याच्या प्रगतीचा अहवाल पंतप्रधान व कॅबिनेट सेक्रेटरीकडे पाठविला जातो. जे लक्ष निर्धारीत केले असेल त्यापेक्षा प्रगती कमी असेल तर त्यावर ताबडतोब उपाय योजना व्हावी या विषयी निर्देश दिले जातात. त्यामुळे प्रगतीची आढावा प्रत्येक महिन्यात सतत घेतला जातो व विषमता निर्माण होत नाही. अशाच स्वरुपाचे कार्यन्वयन व्यवस्था महाराष्ट्र सरकारने निर्माण केली पाहिजे.विकासाच्या बाबतीत राजकीय व प्रशासनाच्या कार्यप्रणालीच्या निःपक्षपातीपणास फार महत्व असते त्या दृष्टीने वर दिलेली उपाययोजना कार्यान्वित केली तर विदर्भाच्या भौतिक विकासातील कमतरता दूर होउन

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-1, July-2013



महाराष्ट्राचा एकजीनसी आर्थिक विकास होउु शकेल. 7

थोडक्यात महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोलनामुळे विदर्भाचा प्रदेश हा मागासच राहिला आहे आणि या विषमतेच्या जाणीवेतून वेगळया विदर्भ राज्याची मागणी होत आहे. ही विषमता दूर करण्यासाठी राज्याला विदर्भातील अनेक महत्वकांक्षी विकास योजना तातडीने हाती घेणे भाग आहे. विदर्भाचा अनुशेष तत्काळ भरून काढण्यात यावा. त्यासाठी विदर्भाला झुकते माप द्यावे लागले तरी भौगोलिक न्यायाच्या दृष्टीने ते देणे सरकारचे कर्तव्य आहे. राज्याअंतर्गत प्रादेशिक असमतोल नाहीसा करून राज्याअंतर्गत समता प्रस्तापित करून हा प्रश्न सोडविता येतो.त्यासाठी राजकीय इच्छा शक्तीची गरज आहे. विदर्भातील जनतेच्या मनातील अन्यायाची भावना दुर करून त्यांना विकासाच्या प्रवाहात सामिल करण्यांत यावे. त्यांच्या अपेक्षा व आकांक्षाकडे दुर्लक्ष न करता त्या पुर्ण करण्यांत याव्या. परंतु जर महाराश्ट्र सरकारला ते करता आले नाही तर विदर्भातील जनता वेगळा विदर्भ हवा अशीच मागणी करणार यात काही गैर नाही.

***संदर्भ :–***

1.बी.बी. पाटील– भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन. पृ. क्र. 408.
2.फाडिया बी.एल. – राजनीति विज्ञान – प्रतियोगिता साहित्य भवन आग्रा. पृ.क्र. 478.
3.Vidarbha movement en.wikipedia.org/wiki/vidarbha-movement.
4.दैनिक लोकसत्ता 14 फेब्रुवारी 2010. पृ. क्र. 6.
5.डॉ.खांदेवाले श्रीनिवास,(2009)–वेगळा विदर्भ कशासाठी?मंगेश प्रकाशन नागपूर,पृ.क्र.19–23.
6.[PDF] Why vidarbha State ? Indian school of political economy www.ispepune.org.in/.../Why-vidarbha.p...
7.लोकराज्य डिसेंबर 2011 – विदर्भ विशेष पृ.क्र.11 माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.